# घटक : उद्योग क्षेत्र

उद्योगाचे महत्व ⇒
① उपभोग्य वस्तूंची निर्मिती.
② भांडवली वस्तूंची निर्मिती
③ सेवा क्षेत्रासाठी - सेवा प्रदान करणाऱ्या वस्तू निर्मिती
④ कृषी क्षेत्रासाठी - Backward linkage म्हणून
⑤ निर्यातीसाठी वस्तू उपलब्ध करण्यासाठी

## उद्योगाचे वर्गीकरण :

### ① मालकीच्या आधारावर

i) सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम → पूर्ण मालकी भारत सरकारची
ii) खाजगी ——"—— → पूर्ण मालकी खाजगी व्यक्ती किंवा व्यक्तीसमूह
iii) संयुक्त ——"—— → मालकी भारत सरकार व काही प्रमाणात खाजगी क्षेत्र.
खाजगी क्षेत्र — भारतीय खाजगी कंपनी / परकीय खाजगी कंपनी.

- भारत सरकारची 51% पेक्षा अधिक भागीदारी असलेल्या उपक्रमांना सार्व. क्षेत्रातील उपक्रम (Public Sector Enterprises - PSE's) म्हणतात.

### ② उत्पादन स्तराच्या आधारावर

– उत्पादनाचा स्तर म्हणजे उपक्रमाचा आकार.
आकार — भांडवली गुंतवणूक किंवा कामगारांची संख्या.

① सूक्ष्म उपक्रम
② लघु उपक्रम
③ मध्यम उपक्रम
④ मोठे उपक्रम.

### ③ वापराच्या आधाराव

① मुलभूत वस्तू उद्योग
② भांडवली वस्तू उद्योग
③ पुनर्निर्माण वस्तू उद्योग
} (औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक (IIP) मोजण्यासाठी या गटांत वर्गीकरण.

④ उपभोग्य वस्तू उद्योग — i) टिकाऊ ii) गैर-टिकाऊ

## औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक : (Index of Industrial Production - IIP)

⇒ भारतात औद्योगिक उत्पादनातील वृद्धी मोजण्यासाठी IIP चा वापर
⇒ आकडे दर महिन्याला. CSO मार्फत - 2011 नंतर - 2004-05 आधारभूत वर्ष.
⇒ निर्देशांकाची गणना करण्यासाठी वर्गीकरण प्रमुख 3 उपक्षेत्रात.

① खाणकाम — 61 वस्तू
② निर्मिती — 620 वस्तू
③ वीज 1 वस्तू

एकूण 682 वस्तू

Scanned by CamScanner

# औद्योगिक धोरण -

→ सरकारने देशाच्या औद्योगिक विकासासाठी स्विकारलेले डावपेच.

⇒ डिसें १९४७ मध्ये औद्योगिक परिषद. ह्यानुसार
१९४८ चा अधिनियम जाहीर

⇒ धोरणे - ① औद्योगिक धोरण अधिनियम १९४८
② —"— १९५६
③ औद्योगिक परवाना धोरण १९७०
④ नवीन औद्योगिक धोरण १९९१

## * औद्योगिक धोरण अधिनियम १९४८ (Industrial Policy Resolution-1948)

उद्दिष्ट्ये - (i) न्याय व संधीची समानता
(ii) लोकांचे जीवनमान उंचावणे
(iii) रोजगार संधी उपलब्ध करून देणे.

वैशिष्ट्ये ① सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्राचे महत्त्व मान्य.
② द्विआयामी डावपेच - i) सार्व. क्षेत्र विस्तार ii) खाजगी क्षेत्रास संमती,
③ उद्योगांचे चार गटात विभाजन.
i) सरकारची मक्तेदारी - ३ क्षेत्रे - शस्त्रास्त्रे, अणुऊर्जा, रेल्वे.
ii) संमिश्र - ६ क्षेत्रे - कोळसा, लोहपोलाद, विमान बांधणी, जहाजबांधणी, टेलिफोन व खनिज तेल.
iii) सरकारी नियंत्रणाखालील - १८ क्षेत्रे - विकास खाजगी संस्थेने पण नियंत्रण सरकार
iv) खाजगी - औषधे, रसायने, यंत्रे, खते, साखर, सिमेंट, कपडे इ. उर्वरीत सर्व उद्योग.

## * औद्योगिक धोरण अधिनियम १९५६ (Industrial Policy Resolution-1956)

३० एप्रिल १९५६ ⇒ पं. नेहरु यांनी लोकसभेत मांडला - जे.सी. कुमारप्पा समितीच्या शिफारशीवरून याचदरम्यान सरकारने समाजवादी समाजरचनेचे तत्त्व स्विकारले होते.
जड उद्योगावर आधारीत दुसरी पंचवार्षिक योजना -

उद्दिष्ट्ये ⇒ i) औद्योगिकरणाचा दर वाढविणे
ii) सार्व क्षेत्राचा विस्तार, सहकारी क्षेत्राची बांधणी
iii) खाजगी क्षेत्राच्या सहभागाला प्रोत्साहन.

वैशिष्ट्ये ⇒ 1) अत्यंत सर्वसमावेशक
2) औद्योगिकीकरण धोरणे, पद्धती, नियम व नियमन या समावेश.
3) सरकारच्या राजकोषीय, मौद्रिक, प्रयुक्तविषयक, व कामगार धोरण समावेश } आर्थिक घटना म्हणतात

३ गटात वर्गीकरण ① अनुसूची अ - १७ उद्योगांचा समावेश
- यांचे ५ गटात वर्गीकरण ① संरक्षण ② जड ③ खनिजे ④ वीज ⑤ वाहतूक व दळणवळण.
यापैकी शस्त्रास्त्रे, अणुऊर्जा, रेल्वे व हवाई वाहतूक → सरकारी मक्तेदारी. उर्वरीत १३ केवळ सरकार स्थापन करु शकेल, आधीपासून चालू असलेले खाजगी उद्योग सुरु राहतील.

Scanned by CamScanner

२ अनुसूची ब : सामिश्र क्षेत्रातील उद्योग : १२ उद्योगक्षेत्रांचा समावेश
नवीन उद्योग सरकार स्थापन करेल खाजगी क्षेत्रास संधी नाकारली जाणार नाही.

अनुसूची क : उर्वरित सर्व उद्योग क्षेत्रे
पुढाकार मुख्यत: खाजगी क्षेत्राचा - सरकार सुविधा उपलब्ध करून देईल.

या अधिनियमामध्ये पुढील बाबींवर भर देण्यात आला:

① लघु उद्योग क्षेत्राचा विकास.
② प्रादेशिक असमतोल कमी करणे
③ व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग साध्य करणे.
④ अधिकाराचे विकेंद्रिकरण.

## * औद्योगिक परवाना पद्धती *

औद्योगिक परवाना म्हणजे सरकारने परवानापत्रात उल्लेखलेल्या वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी दिलेली लेखी संमती. त्यामध्ये प्रकल्पाची जागा, संमती असलेली वस्तू, क्षमता, कालावधी इ. बाबी.

① उद्योग (विकास व नियमन) कायदा: Industries Development & Regulation Act-1951.
⇒ १९४८ च्या अधिनियमाच्या अनुक्रमाने हा कायदा
⇒ गुंतवणूक व उत्पादनाचे नियमन
⇒ या कायद्याने (१९६७ पासून) लघु क्षेत्र आरक्षण धोरण.

② मक्तेदारी व प्रतिबंधात्मक व्यापार पद्धती कायदा : १९६९ -(Monopolies & Restrictive Trade Practices Act-1969 - MRTP-Act)
⇒ 'औद्योगिक स्पर्धा कायदा' म्हणून पारित करण्यात आला.
⇒ i) आर्थिक सत्तेचे केंद्रिकरण होवू नये.
ii) मक्तेदारीच्या व्यापार पद्धतीवर नियंत्रण आणणे.
iii) कंपन्यांचे शेअर्स संपादन करणे व हस्तांतरीत करण्याच्या प्रक्रियेवर नियंत्रण आणणे.

③ परकीय विनिमय नियमन कायदा: Foreign Exchange Regulation Act -1973 ~~FERA~~.
फेरा कायदा — १९४७ च्या जागी.
परकीय चलनाच्या विनिमयाच्या संदर्भात.

## औद्योगिक परवाना धोरण :- 1970

⇒ दत्त समीतीच्या शिफारशी नुसार
i) राष्ट्रीयदृष्ट्या महत्वाच्या ९ क्षेत्रांची गणना 'गाभा क्षेत्र' म्हणून
ii) ५ कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक - उच्च गुंतवणूक क्षेत्र - सार्व.क्षेत्रातील उद्योग वगळून इतर उद्योग.
iii) ३५ —"— मालमत्ता. मोठे उद्योग गृट
iv) या धोरणात पहिल्यांदा तत्वत: 'संयुक्त क्षेत्राची' संकल्पना स्विकारण्यात आली-
पुढे १९७३ चे धोरण वक्तव्य :⇒ मोठे गृट ३५ कोटीहून २० कोटी
संयुक्त उद्योग स्थापन करण्याचे प्रयत्न अपयशी झाले.

Scanned by CamScanner

## : नवीन औद्योगिक धोरण : १९९१.

⇒ या धोरणाला नवीन आर्थिक धोरण असे म्हणतात.

यामधील धोरणात्मक निर्णय;

i) औद्योगिक परवाना पद्धती रद्द

ii) सार्वजनिक क्षेत्राची भूमिका कमी करण्यात आली.

iii) लघु उद्योग क्षेत्र आरक्षण —॥—

iv) खाजगीकरण व निर्गुंतवणूकीकरण धोरण लागू

v) परकीय गुंतवणूक व तंत्रज्ञानास मुक्त प्रवेश.

## १९९१ नंतरची धोरणे :

### ① औद्योगिक परवाना धोरणाचे उदारीकरण :

उद्योग विकास व नियमन कायदा १९५१ अन्वये परवाना उद्योगांच्या यादीचे वेळोवेळी परिक्षण : सध्या केवळ ५ उद्योग क्षेत्रासाठी परवाना अनिवार्य.

① मद्यार्क पेय

② सिगार, सिगारेट, तंबाखूजन्य पदार्थ

③ एअरोस्पेस, इलेक्ट्रिक

④ औद्योगिक स्फोटके, आगपेट्यांसहीत

⑤ घातक रसायने.

### ② सार्वजनिक क्षेत्र आरक्षण धोरणाचे शिथिलीकरण.

१९९१ मधील सार्व. क्षेत्रातील (उद्योग क्रमाक्रमाने अनारक्षित करण्यात आली. सध्या केवळ 2 — ① अणूऊर्जा

② रेल्वे ऑपरेशन्स -(समर्पित कॉरीडॉर, हाय स्पीड ट्रेन, फ्रेट कॉरिडॉर, विद्युतीकरण, सिग्नल व्यवस्था, फ्रेट व पॅसेंजर टर्मिनल्सचे बांधकाम वगळता)

### ③ लघुउद्योगांसाठी धोरण : 

व्याख्या: सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम कायदा २००६ अन्वये.

⇒ आरक्षणाच्या धोरणाचे परिक्षण करून ६०० हून अधिक वस्तू अनारक्षित करण्यात आल्या. केवळ 20 वस्तू आरक्षित.

⇒ आरक्षित वस्तूंचे उत्पादन मोठ्या उद्योगांना करायचे असल्यास परवाना आवश्यक तसेच ५० % उत्पादने निर्यात करण्याचे बंधन.

मात्र १००% निर्यातप्रधान उद्योग, निर्यात प्रक्रिया विभाग, विशेष आर्थिक विभाग यातील उद्योगांना परवाना घेण्याची सूट आली.

⇒ १० एप्रिल २०१५ पासून लघु उद्योग धोरणामधील आरक्षण पूर्णपणे काढून टाकले.

### ④ इलेक्ट्रॉनिक हार्डवेअर टेक्नॉलॉजी पार्क (EHTP) व सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क (STP) योजना :

उद्दिष्ट: मजबूत इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाची उभारणी करणे व निर्यात वाढवणे.

Scanned by CamScanner

EHTP ⇒ एप्रिल १९९३ पासून
हार्डवेअर क्षेत्रात परकीय गुंतवणूक आकर्षित करणे.

STP ⇒ जून १९९१ - एक सोसायटी म्हणून
सॉफ्टवेअरच्या विकास व निर्यातीस प्रोत्साहन
सन २०११ मध्ये पार्कस स्थापन करण्यास कर सवलती.

## राष्ट्रीय विनिर्माण धोरण २०११ - National Manufacturing Policy.

विनिर्माण / कारखानदारी क्षेत्राचा विकास सुनिश्चित करण्यासाठी १ गट.
अहवाल २००८ - त्या शिफारशीनुसार 4 नोव्हे २०११ - राष्ट्रीय विनिर्माण धोरण जाहीर

उद्दिष्टये ⟹
1. मध्यम कालावधीत कारखानदारी क्षेत्रात १२ ते १४% इतकी वार्षिक वृद्धी साध्य
2. २०22 पर्यंत GDP मधील कारखानदारीचा हिस्सा २५% पर्यंत साध्य करणे.
3. २०२२ पर्यंत १० कोटी अतिरिक्त रोजगार निर्मिती
4. योग्य कौशल्यांचा विकास.
5. कारखानदारी क्षेत्राची जागतिक स्पर्धाशक्ती उंचावणे.

इतर बाबी ⟹
1. व्यवसाय नियमनाचे सरलीकरण
2. रोजगार निर्मितीसाठी कौशल्य विकासास उच्च अग्रक्रम.
3. पडीक व अलागवडक्षम जमिनीवर "राष्ट्रीय गुंतवणूक व कारखानदारी क्षेत्रे" स्थापन करण्याची तरतुद.

या क्षेत्रांची महत्त्वाची वैशिष्ट्ये.
1. 5000 हेक्टर योग्य जमीन - निवड राज्य शासन.
2. 30% क्षेत्र औद्योगिक एककांसाठी
3. पायाभूत सुविधा (पाणी, वीज जोडणी इ) - राज्य शासन
4. नियोजनाच्या खर्चाचा सर्व भार - केंद्र शासन
तसेच रेल्वे, रस्ते, महामार्ग, विमानतळे, दूरसंचार - बाह्य पायाभूत सुविधा.

## राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स धोरण - २०१२

⇒ इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची निर्यात हा प्रमुख उद्देश.
⇒ २५ ~~फेब्रु~~ (ऑक्टो.) २०१२ राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स धोरणास संमती.
⇒ २६ फेब्रु २०१२ - माहिती तंत्रज्ञान विभागाचे नामकरण 'इलेक्ट्रॉनिक व माहिती तंत्र विभाग'

उद्दिष्टये ⇒ ① २०२० पर्यंत ⟹ १०० अब्ज डॉलरची गुंतवणूक → २८ दशलक्ष रोजगार, ४०० अब्ज डॉलर्स पर्यंत वाढविणे.

② चीप डिझाईन व एम्बेडेड सॉफ्टवेअर इंडस्ट्रिज चा विकास.
③ निर्यात - २०२० पर्यंत ५.५ अब्ज डॉलरवरून ८० अब्ज डॉलरपर्यंत.
④ कुशल मनुष्य बळाची उपलब्धता
⑤ इले. वस्तू व सेवांच्या गुणवत्ता मूल्यांकनासाठी राष्ट्रस्तरीय संस्थात्मक व्यवस्था.

Scanned by CamScanner

# * भारतातील सार्वजनिक क्षेत्र *

→ सरकारी मालकीच्या महामंडळांना सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम असे संबोधतात.

→ बहुमताचे भाग भांडवल (51% पेक्षा अधिक) – केंद्र सरकारचे
– राज्य सरकारचे
– केंद्र व एक किंवा अधिक राज्य सरकारांचे

→ औद्योगिक धोरण 1956 नुसार उद्योगांचे 3 गटात वर्गीकरण.

गट-1 - अनुसूची अ → ज्यांच्या भविष्यकालीन विकासाची जबाबदारी शासनाची
गट-2 - अनुसूची ब → पुढाकार शासनाचा मात्र खाजगी क्षेत्राचाही सहभाग
गट-3 → सर्व खाजगी उद्योग.

→ 1969 मध्ये 14 बँकांचे राष्ट्रीयीकरण.

→ 1970 औद्योगिक परवाना धोरण.

→ 1991 - मात्र निर्गुंतवणूकीच्या माध्यमातून खाजगी करणाचे धोरण.

## सार्व. क्षेत्रातील उपक्रमाचे वर्गीकरण :

① केंद्रिय सार्व. क्षेत्र उपक्रम :- (Central Public Sector Enterprises) - CPSE's

→ केंद्र शासनाची मालकी वर्गीकरण दोन गटात.
i) व्युहात्मक ii) गैर व्युहात्मक

i) व्युहात्मक → ① शस्त्रास्त्रे व दारुगोळा
② अणू ऊर्जा
③ रेल्वे वाहतूक

ii) गैर व्युहात्मक → इतर.

② सार्वजनिक क्षेत्र बँका → (Public Sector Banks - PSB's)

③ राज्यस्तरीय सार्व. क्षेत्र उपक्रम → (State Public Sector Enterprises - SPSEs)

## सेक्शन 25 कंपन्या

– वाणिज्य, कला, विज्ञान, धर्म, धर्मदाय व इतर कोणत्याही उपयुक्त कामास प्रोत्साहनाच्या उद्देश असलेल्या मात्र नफ्याचा उद्देश नसलेल्या सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांची नोंदणी 'कंपनी कायदा' 1956 च्या सेक्शन 25 अंतर्गत गैर नफा कंपनी म्हणून करता येते.
अशा उपक्रमांना मर्यादित जबाबदारीची कंपनी म्हणून संबो मात्र मर्यादित किंवा खाजगी मर्यादित शब्दप्रयोग करता येत नाही.
गैरनफा किंवा ना नफा ना तोटा कंपन्या म्हणतात.

## महारत्न, नवरत्न, व मिनिरत्न कंपन्या :

सार्व. उपक्रम विभागामार्फत केंद्रिय सार्व उपक्रमांना हा दर्जा दिला जातो.
सुरुवात - नवरत्न व मिनिरत्न - 1997 पासून
महारत्न - डिसें 2010 —

Scanned by CamScanner

**महारत्न** → निकष: गेल्या 3 वर्षांमध्ये
i) 2500 कोटी + वार्षिक निव्वळ नफा.
ii) 10,000 कोटी - सरासरी निव्वळ मूल्य
iii) 20,000 कोटी + सरासरी उलाढाल

→ फायदे ⇒ सरकारी पूर्व संमतीविना एकाच प्रकल्पात 5000 कोटी रु किंवा त्यांच्या निव्वळ 15% पर्यंत गुंतवणूक.

सध्याच्या - 8-कंपन्या:
1. ONGC
2. IOC
3. NTPC
4. SAIL
5. GAIL
6. CIL
7. BHEL
8. BPCL

**नवरत्न**: निकष: ① मिनिरत्न दर्जाप्राप्त कंपनी.
② 100 पैकी 60 स्कोअर मिळणे गरजेचे — आधार
i) निव्वळ मूल्याचे निव्वळ नफ्याशी प्रमाण
ii) एकूण खर्चापैकी एकूण मनुष्यबळ
iii) नफ्याचे भांडवलाशी प्रमाण
iv) नफ्याचे उलाढालीशी प्रमाण
v) प्रती शेअर प्राप्ती
vi) आंतर क्षेत्रीय प्रगती.

16 कंपन्या:

1. Bharat Electronics Ltd (BEL)
2. Container Corporation of India Ltd.
3. Engineers India Ltd)
4. Hindustan Aeronotics Ltd.
5. HPCL
6. Mahanagar Telephone Nigam Ltd - (MTNL)
7. National Aluminium Co. Ltd - (NALL)
8. National Building Constraction Corporation Ltd.
9. Neyvelli lignite Corporation Ltd.
10. Power Finance ~~Company~~ Corporation Ltd (PFC)
11. Power Grid Corporation of India Ltd.
12. Rastriya Ispat Nigam Ltd.
13. Rural Electrification Corporation Ltd.
14. Shiping Corporation of India Ltd
15. Oil India Ltd (OIL)
16. NMDC - National mineral Development Corporation.

Scanned by CamScanner

① मिनिरत्न I = i) गेल्या 3 वर्षात सतत नफा.

ii) पैकी कोणत्याही एका वर्षात 30 कोटीपेक्षा अधिक निव्वळ नफा.

iii) निव्वळ मूल्य - धनात्मक असावे.

फायदे -
- 500 कोटी रुपयापर्यंत गुंतवणूक स्वायत्तता.
- परदेशात संयुक्त उद्योग, संलग्न कंपन्या व परदेशी कार्यालये स्थापन करता येतात

संख्या 60 मिनिरत्न I दर्जाच्या कंपन्या

② मिनिरत्न II : i) गेल्या 3 वर्षात निव्वळ नफा.

ii) निव्वळ मूल्य धनात्मक.

फायदे
- 300 कोटी रु गुंतवणूक स्वायत्तता / निव्वळ मूल्याच्या 50% इतकी.
- परदेशात संयुक्त उद्योग स्थापन करता येतात.

संख्या ⇒ 95

Scanned by CamScanner